# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र | जिल्हा District: मुंबई | पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि. | पहिली खबर क्र. FIR No.: 14 | वर्ष Year: 2026 | दिनांक Date: 19/05/2026

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र. अधिनियम 1988 | कलमे Sections: कलम 7
   (ii) अधिनियम Act: ........ | कलमे Sections: ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: मंगळवार | तारीख पासून Date from: 03/02/2026 | वेळ Time: — | तारीख पर्यंत Date to: 19/05/26 | वेळ Time: 15:55

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. — तारीख Date: 13/04/2026 | वेळ Time: ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 50/26 | तारीख Date: 19/05/2026 | वेळ Time: 23:30

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name | ठिकाणाचे नंबर No. if any | गल्ली Ward | रस्त्याचे नाव Name of road:
विभागीय शिक्षण उप संचालक यांचे कार्यालय, आठवा मजला
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place | गाव Village | पोस्ट Post | तालुका Taluka | जिल्हा Dist. | राज्य State:
मित्तल हॉस्पीटल, नेताजी सुभाषचंद्र रोड, चर्नी रोड, मुंबई

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: सुनिता दिघे
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: पांडुरंग दिघे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 36 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय | फोन नं. Phone No.: 8425859002
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
(f) व्यवसाय Occupation: नोकरी
(g) धर्म Religion: हिंदू | जात Caste: — | जन्मजात Sub-Caste: —
(h) पत्ता Address | गल्ली/सर्व्हे नं. Ward | घर/नाव नं. House Name No. | फोन/मो. नं. Phone No. | पॅन नं. Pan No. | वोटर्स नं. Card No.:
रूम नं. 7, 3 मजला, 10 पोलीस अधिकारी निवासस्थान, दादोजी कोंडदेव रोड, भायखळा पुर्व, मुंबई
रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

राहुल विठ्ठल शिंदे, वय 36 वर्षे, पद - वरिष्ठ लिपीक, नेमणूक - विभागीय शिक्षण उप संचालक कार्यालय, चर्नी रोड, मुंबई, रा.ठि. फ्लॅट नं. 64, प्राईमरोज म्हाडा बिल्डींग नं. 2, रुणवाल गार्डन सिटी, मानपाडा, कल्याण शिळ रोड, डोंबिवली, जि. ठाणे.



Scanned with OKEN Scanner

## फिर्याद

दि. 19/05/2026

फिर्यादी नामे सुनिता दिघे, वय 36 वर्षे, धंदा नोकरी रा.ठि. रूम नं. 07, तिसरा मजला, 10 पोलीस अधिकारी निवासस्थान, दादोजी कोंडदेव रोड, भायखळा 400027 मो.नं. 8425859002 यांचा स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेला जबाब हाच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष

S.G.Sonawane
(सुनयना सोनावणे)
पोलीस निरीक्षक
भा.प्र.वि., मुंबई.

Sunitadighe
(सुनिता पांडुरंग दिघे).

Scanned with OKEN Scanner

# फिर्याद

दिनांक १९/०५/२०२६

श्रीमती सुनिता पांडुरंग दिघे, वय ३७ वर्षे, धंदा नोकरी (पोलीस निरीक्षक) रा.ठी. रूम नं ०७, तिसरा मजला, १० पोलीस अधिकारी निवासस्थान, दादोजी कोंडदेव रोड, भायखळा मुंबई ४०००२७ मो.नं:- ८४२५८५९००२

———————

मी वरिलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर राहावयास आहे. मी दिनांक १२/०७/२०२३ रोजी पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

मी दिनांक १३/०४/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक २०/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता सापळा अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त, महेश जाधव यांची नेमणुक केल्याबाबत आदेश प्राप्त झाला. नमुद आदेशान्वये मी व स.पो.आ. जाधव यांनी स.पो.आ (प्रशासन) अजित सुळे यांना तात्काळ रिपोर्ट केला. स.पो.आ प्रशासन यांनी मला व स.पो.आ. जाधव यांना तक्रारदार श्री. महेंद्र मोहन चौधरी यांची ओळख करून दिली. तक्रारदार यांना देखील माझी व स.पो.आ. जाधव यांची ओळख करून दिली. स.पो.आ. प्रशासन यांनी मला व स.पो.आ. जाधव यांना तक्रारदार यांची तक्रार ऐकुन घेवुन पुढील कायदेशीर कारवाई करण्याबाबत सांगितले.

नमुद पडताळणीमधील तक्रारदार यांना त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे नाव श्री. महेंद्र मोहन चौधरी वय ३५ वर्षे धंदा – नोकरी, पत्ता:- रूम नं १६, साई अपार्टमेंट, कोपरीगाव ता. वसई, जि. पालघर असे असल्याचे सांगितले.

तक्रारदार श्री. महेंद्र मोहन चौधरी यांनी त्यांचे तक्रारीबाबत स्वहस्ताक्षरात तक्रारअर्ज सादर केला. तक्रारदार यांचे तक्रारीची हकीकत अशी सांगितली की, "तक्रारदार हे श्री. जीवदानी देवी संस्थान संचलित भास्कर वामन ठाकुर शिक्षण संकुल, विरार (पुर्व) या शाळेत लिपिक या पदावर ०७ जुलै २०२५ पासुन कार्यरत आहेत. तक्रारदार हे शिक्षण संकुल च्या सर्व फाईल्स चा पाठपुरावा करण्याचे काम करतात. तक्रारदार यांच्या कनिष्ठ महाविदयालयाची इयत्ता ११ वी ते १२ वी वर्गांना प्रथम मान्यता मिळणेबाबतची फाईल दि.२३/०५/२०२५ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद पालघर यांनी मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड मुंबई यांना जा.क्र. पाजिप/शिक्षण/माध्य/वशि/का.क्र.०१/२०२५/१४७४ अन्वये पुढील कार्यवाही करिता पाठविलेली आहे. नमुद फाईलचा तक्रारदार हे शिक्षण विभागात जावुन पाठपुरावा करतात. नमुद फाईल क्लिअर करण्यासाठी तक्रारदार यांचे कडे शिक्षण विभागाचे क्लार्क राहुल शिंदे यांनी स्वत:करिता व साहेबाकरिता रूपये दोन लाख लाचेची मागणी केली आहे. तक्रारदार यांनी मॅनेजमेंट एवढे पैसे दयायला तयार नाही असे सांगितल्याने क्लार्क शिंदे यांनी तडजोडी अंती रूपये दीड लाख लाचेची मागणी केली. तक्रारदार हे सहायक शिक्षण संचालक श्री. सुनिल सावंत यांना त्याचे केबीनमध्ये जावुन भेटले. तक्रारदार यांनी श्री. सुनिल सावंत यांना मॅनेजमेंट एवढे दिड लाख द्यायला तयार नाही, असे सांगितले असता श्री. सुनिल सावंत यांनी क्लार्क शिंदे यांना भेटा असे सांगितले. तक्रारदार श्री. चौधरी यांची क्लार्क शिंदे व सहायक शिक्षण संचालक श्री. सुनिल

Sunitadighe
PI



Scanned with OKEN Scanner

सावंत यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक १३/०४/२०२६ रोजी स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज दिला.

दिनांक १३/०४/२०२६ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे श्री. कैलास ग्यानिराम रहांगडाले, पद –परिरक्षण भुमापक, कार्यालयाचा पत्ता – नगर भुमापन अधिकारी, ४था व ५वा माळा, महसुल भवन, बांद्रा (पश्चिम), मुंबई २) श्रीमती मंगल भगवानराव पावडे, पद – लिपिक टंकलेखक, कार्यालयाचा पत्ता – प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पश्चिम, १११/डी, आंबिवली व्हिलेज, अंधेरी, मुंबई यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर मी व स.पो.आ. जाधव यांनी तक्रारदार यांची पंचाना ओळख करुन दिली. तक्रारदार यांच्या तक्रारीची थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांनी तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून सपोआ महेश जाधव तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज मी माझ्या ताब्यात घेतला.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. चौधरी यांना पंचासोबत लोकसेवक शिंदे, लोकसेवक सावंत यांचे कार्यालयात कामासंदर्भात चर्चा करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. सदर वेळी लोकसेवक लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्यात येणार असून सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येईल, असे सांगितले.

दिनांक १३/०४/२०२६ रोजी पडताळणी कारवाईदरम्यान सापळा अधिकारी, तक्रारदार श्री. चौधरी व पंच यांचे वक्तव्य नोंद करून तक्रारदार यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. कैलास रहांगडाले यांचेसोबत लोकसेवक श्री. राहूल शिंदे यांचे विभागीय शिक्षण उप संचालक यांचे कार्यालयात प्रलंबित कामाबाबत चर्चा करण्यासाठी पाठविले. दिनांक १३/०४/२०२६ रोजी पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार व लोकसेवक यांच्यामध्ये पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत झालेले संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आली. त्यातील खालील नमुद संभाषणावरून लोकसेवक शिंदे यांनी तक्रारदार यांच्याकडे रूपये दिड लाख लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

| | |
|---|---|
| तक्रारदार | ऐकाना सर अ... अ... दिड दिड नंतर पुन्हा तुमचे काय वरती काय द्यायचे कसे? |
| लोकसेवक शिंदे | काय म्हणतायं? |
| तक्रारदार | अ... दिड नंतर कोणावर तुमचे काय दयावे लागतील का त्याच्यातच? |
| लोकसेवक शिंदे | नाय... नाय त्यातचं. |
| तक्रारदार | त्यातचं का तुमचं? |
| लोकसेवक शिंदे | हो.हो. |

दिनांक १३/०४/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार हे लोकसेवक सहाय्यक उप संचालक सुनिल सावंत यांना त्यांचे केबिनमध्ये जाऊन भेटले, त्यावेळी पंच श्री. कैलास रहांगडाले हे देखील सोबत होते. तक्रारदार यांनी लोकसेवक सुनिल सावंत यांच्याशी प्रलंबित कामासंदर्भात चर्चा केली. नमुद



Scanned with OKEN Scanner

चर्चेमध्ये तक्रारदार यांनी लोकसेवक सावंत यांना मॅनेजमेंट तयार असल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक सावंत यांनी करून देतो, असे सांगितले. दिनांक १३/०४/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईचा पंचासमक्ष पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यावर माझी व पंचांची स्वाक्षरी केलेली आहे.

दिनांक १५/०४/२०२६ रोजी पडताळणी कारवाईदरम्यान सापळा अधिकारी, तक्रारदार श्री. चौधरी व पंच यांचे वक्तव्य नोंद करून तक्रारदार यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. कैलास रहांगडाले यांचेसोबत लोकसेवक सहाय्यक उप संचालक सुनिल सावंत यांचे विभागीय शिक्षण उप संचालक यांचे कार्यालयात प्रलंबित कामाबाबत चर्चा करण्यासाठी पाठविले. दिनांक १५/०४/२०२६ रोजी लोकसेवक सुनिल सावंत यांची भेट झाली नाही. लोकसेवक राहूल शिंदे यांची भेट झाली. त्यांनी तक्रारदार यांना सावंत साहेब मिटींगमध्ये असल्याचे सांगितले. लोकसेवक शिंदे यांनी तक्रारदार यांना ०१ आठवडा थांबायला सांगितले. दिनांक १५/०४/२०२६ रोजी तक्रारदार व लोकसेवक शिंदे यांच्यामध्ये झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले असून त्याबाबतचा पडताळणी पंचनामा पंचासमक्ष करण्यात आलेला आहे. त्यावर माझी व पंचांची स्वाक्षरी केलेली आहे.

दिनांक १६/०४/२०२६ रोजी पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार यांनी पंचासमक्ष त्यांचा मोबाईल क्र. ९५०३२१३२१० यावरून लोकसेवक शिंदे यांचा मोबाईल क्र. ९७६३१४०७७५ यावर व्हॉटस्अप कॉल केला. त्याबाबत पडताळणी पंचनामा करण्यात आला असून त्यामध्ये ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आलेली आहे. त्या पंचनामा वर माझी व पंचांची स्वाक्षरी केलेली आहे. खालील संभाषणावरून लोकसेवक शिंदे यांनी फोनवर लाचेच्या रक्कमेबाबत दुजोरा दिला असुन फोनवर लाचेच्या रक्कमेबाबत न बोलण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देवुन काळजी घेत असल्याचे दिसुन येत आहे. यावरून लोकसेवक शिंदे यांचा लाच घेण्याचा उद्देश दिसुन येत आहे.

| | |
|---|---|
| तक्रारदार | **हो, चालेल सर. दिड लाख देवून ठेवलेत सर माझ्याकडं, तेवढचंना वरती नाही ना यात.** |
| लोकसेवक शिंदे | **ऐकाना पैशाचं काय बोलु नका. ऐका फोनवर नका बोलु. मी कळवतो तुम्हाला सर प्लिज हम.** |

दिनांक १६/०४/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईचा पंचासमक्ष पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यावर माझी व पंचांची स्वाक्षरी केलेली आहे.

दिनांक २८/०४/२०२६ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा कारवाईदरम्यान सापळा अधिकारी, तक्रारदार व पंच यांचे वक्तव्य नोंद करण्यात आले. पंचासमक्ष तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली. अंगझडतीमध्ये तक्रारदार यांनी सापळा कारवाईकरीता वापरण्यात येणारी लाचेची रक्कम रुपये ५०,०००/– सापळा अधिकारी यांचेकडे हजर केली. नमुद रूपये ५००/– दराच्या १०० भारतीय चलनी नोटांचे छायांकित प्रत काढुन त्यावर सापळा अधिकारी व पंच यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पंचांना व तक्रारदार यांना पो.ह. नागेश शेमडकर यांनी सापळा कारवाईकरीता वापरण्यात येणारा अॅल्ट्राव्हायलेट दिवा व अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले. सापळा कारवाईमध्ये तक्रारदार यांनी हजर केलेले रूपये पन्नास हजार व उर्वरित रूपये एक लाख खेळण्यातल्या नोटा वापरण्यात आल्या. नमुद



PI

नोटांना पो.ह. शेमडकर यांनी दोन्ही बाजूस कापसाच्या बोळयाने अॅन्थासिन पावडर लावून नमुद रक्कम रूपये एक लाख पन्नास हजार केशरी रंगाच्या पाकिटामध्ये ठेऊन स्टेपलर मारून बंद केले. पो.ह. शेमडकर यांनी केशरी रंगाच्या पाकिटास बाहेरून कापसाच्या बोळयाने अॅन्थासिन पावडर लावण्यात आली. ते पाकिट तक्रारदार यांच्या काळया रंगाच्या बॅगेमध्ये अलगद ठेवली. सापळा अधिकारी यांनी पोलीस पथक, पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सूचना दिल्या. तक्रारदार यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच दिपा गवते यांच्यासह लाचेची रक्कम घेऊन लोकसेवक शिंदे यांचे कार्यालयात पाठविले. लोकसेवक शिंदे व तक्रारदार यांची भेट झाली. त्यावेळी पंच दिपा गवते ह्या तक्रारदार यांचे सोबतच होत्या. तक्रारदार व लोकसेवक शिंदे यांच्यामध्ये प्रलंबित कामाच्या अनुषंगाने चर्चा झाली. लोकसेवक यांनी प्रलंबित कामाची ऑर्डर झाली नाही. कंकाळ साहेब सुट्टीवर आहेत. अकरा तारखेनंतर सह्या होतील, तेव्हा सांगतो, असे सांगितले. तक्रारदार यांनी लाचेची रक्कम आणल्याचे सांगितले असता, लोकसेवक शिंदे यांनी थांबा, ऑर्डर होऊ द्या, असे म्हणाले. दिनांक २८/०४/२०२६ रोजीचा सापळापूर्व पंचनामा करण्यात आला असून त्यामध्ये तक्रारदार व लोकसेवक यांच्यामध्ये झालेल्या संभाषणाची ट्रान्सस्क्रिप्ट तयार करण्यात आलेली आहे. पंचनाम्यावर मी व पंचांनी स्वाक्षरी केलेली आहे.

दिनांक १९/०५/२०२६ रोजी सापळापूर्व/सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळापूर्व/ सापळा कारवाईदरम्यान सापळा अधिकारी, तक्रारदार, पंच यांचे वक्तव्य नोंद करण्यात आले. पंचासमक्ष तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली. अंगझडतीमध्ये तक्रारदार यांनी सापळा कारवाईकरीता वापरण्यात येणारी लाचेची रक्कम रुपये ५०,०००/— सापळा अधिकारी यांचेकडे हजर केली. नमुद रूपये ५००/— दराच्या १०० भारतीय चलनी नोटांचे छायांकित प्रत काढुन त्यावर सापळा अधिकारी व पंच यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पंचांना व तक्रारदार यांना पो.ह. नागेश शेमडकर यांनी सापळा कारवाईकरीता वापरण्यात येणारा अॅल्ट्राव्हायलेट दिवा व अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले. सापळा कारवाईमध्ये तक्रारदार यांनी हजर केलेले रूपये पन्नास हजार व उर्वरित रूपये एक लाख खेळण्यातल्या नोटा वापरण्यात आल्या. नमुद नोटांना पो.ह. शेमडकर यांनी दोन्ही बाजूस कापसाच्या बोळयाने अॅन्थासिन पावडर लावून नमुद रक्कम रूपये एक लाख पन्नास हजार केशरी रंगाच्या पाकिटामध्ये ठेऊन स्टेपलर मारून बंद केले. पो.ह. शेमडकर यांनी केशरी रंगाच्या पाकिटास बाहेरून कापसाच्या बोळयाने अॅन्थासिन पावडर लावण्यात आली. ते पाकिट तक्रारदार यांच्या काळया रंगाच्या बॅगेमध्ये अलगद ठेवली. सापळा अधिकारी यांनी पोलीस पथक, पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सूचना दिल्या. तक्रारदार यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच खंडार यांच्यासह लाचेची रक्कम घेऊन लोकसेवक शिंदे यांचे कार्यालयात पाठविण्यात आले. दिनांक २८/०४/२०२६ रोजीच्या सापळापूर्व कारवाईदरम्यान लोकसेवक शिंदे यांनी तक्रारदार यांना येताना कोणाला घेऊन येऊ नका अशी सूचना केल्याने पंच खंडार यांना तक्रारदार यांच्या पासून काही अंतरावर थांबवून तक्रारदार व लोकसेवक शिंदे यांचे बोलणे ऐकण्याचा व हालचालीवर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. तक्रारदार व लोकसेवक शिंदे यांच्या भेटीदरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबित कामाबाबतची ऑर्डर दिली. लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडून रूपये दिड लाख लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर पोलीस पथकाने पंचासमक्ष लोकसेवक यांना रंगेहाथ पकडले. दिनांक १९/०५/२०२६ रोजीचा सापळापूर्व/सापळा पंचनामा करण्यात आला असून त्यामध्ये तक्रारदार व



Scanned with OKEN Scanner

लोकसेवक यांच्यामध्ये झालेल्या संभाषणाची ट्रान्सस्क्रिप्ट तयार करण्यात आलेली आहे. पंचनाम्यावर मी व पंचांनी स्वाक्षरी केलेली आहे.

तरी, दिनांक १३/०४/२०२६, १५/०४/२०२६, १६/०४/२०२६, २८/०४/२०२६ रोजी केलेल्या पडताळणी/सापळापूर्व कारवाई दरम्यान लोकसेवक राहूल विठ्ठल शिंदे, पद – वरिष्ठ लिपिक, कार्यालय पत्ता – विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, ८ वा मजला, मित्तल आयुर्वेदिक हॉस्पिटल, चर्नीरोड (प.), मुंबई यांनी श्री. जीवदानी देवी संस्थान संचलीत भास्कर वामन ठाकूर, शिक्षण संकूल, विरार (पूर्व) या संस्थेची इयत्ता ११ वी ते १२ वी वर्गांना प्रथम मान्यता मिळण्याबाबतची फाईल क्लिअर करण्यासाठी तक्रारदार महेंद्र चौधरी यांचेकडून रूपये दिड लाख लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. दिनांक १९/०५/२०२६ रोजी १६.०० वा. सापळापूर्व/सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक राहूल विठ्ठल शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडून रूपये १,५०,०००/– लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहाथ पकडण्यात आले, म्हणून माझी लोकसेवक राहूल विठ्ठल शिंदे यांचे विरोधात कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

पडताळणी कारवाई क्र. २०/२०२६ मध्ये करण्यात आलेल्या कारवाईचे खालील कागदपत्रे पुढील तपासकामी तपासी अधिकारी यांच्याकडे सुपूर्त करीत आहोत.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | अपर पोलीस आयुक्त यांचा दिनांक १३/०४/२०२६ रोजीचा कार्यालयीन आदेश | ०१ |
| २ | तक्रारदार यांचा दिनांक १३/०४/२०२६ रोजीचा तक्रार अर्ज व कागदपत्र | ०२ ते ०८ |
| ३ | दिनांक १३/०४/२०२६ रोजीचा पडताळणी पंचनामा | ०९ ते १९ |
| ४ | दिनांक १५/०४/२०२६ रोजीचा पडताळणी पंचनामा | २० ते २७ |
| ५ | दिनांक १६/०४/२०२६ रोजीचा पडताळणी पंचनामा | २८ ते ३३ |
| ६ | दिनांक २८/०४/२०२६ रोजीचा सापळापूर्व/सापळा पंचनामा | ३४ ते ५५ |
| ७ | दिनांक १९/०५/२०२६ रोजीचा सापळापूर्व/सापळा पंचनामा | ५६ ते ८८ |
| ८ | लोकसेवक राहूल विठ्ठल शिंदे यांचा दिनांक १९/०५/२०२६ रोजीचे लेखी निवेदन | ८९ |

माझा जबाब मराठी भाषेत संगणकीकृत केला असुन तो मी वाचुन पाहीला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

S.B.Sonawane

(सुनयना सोनवणे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Sunitadighe

(सुनिता दिघे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ……… —

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

……… —

……… —

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ………

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ……… —

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी कॉलम नं. 7 मधील आरोपी लोकसेवक यांनी श्री उत्कर्ष देवी संस्थान संचलीत भास्कर वामन ठाकूर शिक्षण संकुल, विरार पूर्व या संस्थेचे इयत्ता 11 वी ते 12 वी वर्गांना प्रथम मान्यता मिळण्याबाबतची फाईल क्लिअर करण्यासाठी तक्रारदार महेंद्र चौधरी यांच्याकडे रुपये दीड लाख लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. दि. 19/05/2025 रोजी 15:55 वा. सापळापूर्व सापळा कारवाई दरम्यान कॉलम 7 मधील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडुन दिड लाख रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहात पकडण्यात आले म्हणुन फिर्यादी यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने गुन्हा कलम 7 भ्र.प्र. अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ………

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

………

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ……… जिल्हा ……… राज्य ………

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..................................................

(3) Transferred to P. S. ...................................
District .................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature]
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

[signature] S.B. Sonawane
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ......सुनयना सोनावणे......

पदनाम Rank ......पोलीस निरीक्षक......

तपासिक अ. चा कोड क्र. ......ला.प्र.वि. मुंबई......
Posting

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........................................
1. Date and time of submitted to the Court.

Code No. of I. O. ..........................................

| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner